लोकमत

# जिल्हाधिकारी कार्यालयात बार्टीकडून वृक्षारोपण

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्या समतादूत प्रकल्पाच्या माध्यमातून जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी जिल्हाधिकारी कार्यालय सर्वसाधारण शाखेचे तहसीलदार श्रावण ताथे, बार्टी जिल्हा प्रकल्प अधिकारी शीतल बंडगर, समतादूत प्रशांत कुलकर्णी, शशिकांत जाधव यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी बार्टीच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

Pune Main
Page No. 2 Jun 18, 2021
Powered by: erelego.com